| | | |
|---|---|---|
| MHND240009962025 | दाखल दिनांक | १९/०७/२०२५ |
| | नोंद दिनांक | १९/०७/२०२५ |
| | निकाल दिनांक | ०४/०५/२०२६ |
| | कालावधी | ००व. ०९म. १५दि. |

## भाग – अ

**नायगाव येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी– श्रीमती ए. टी. गित्ते, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, नायगाव बा.)**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.– ४३७/२०२५

दिनांक – ०४ मे , २०२६

| | | |
|---|---|---|
| | | **निशाणी क्र– ०६ खाली** |
| | | गुन्हा नोंदणी क्र– १६२/२०२५ |
| तक्रारदार | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस स्टेशन नायगाव |
| | | |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. आर. व्ही. देशमुख, सहा. सरकारी अभियोक्ता** |
| | | |
| आरोपी | | **कृष्णकांत पंढरीनाथ संपतवार**<br>वय – ३६ वर्षे, धंदा– मजुरी,<br>रा. कोलंबी, ता. नायगांव, जि. नांदेड. |
| | | |
| प्रतिनिधीत्व | | **श्री. डी. ए. कुलकर्णी विधीज्ञ.** |
| | | |

## भाग – ब

| | | |
|---|---|---|
| **गुन्हा घडल्याचा दिनांक** | | १९/०७/२०२५ |
| | | |
| **प्रथम अहवाल खबर दिनांक** | | १९/०७/२०२५ |
| | | |
| **दोषारोपपत्र दाखल दिनांक** | | २४/०७/२०२५ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | २९/०१/२०२६ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | | १८/०३/२०२६ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिंनाक | | ---- |
| न्यायानिर्णयाचा दिनांक | | ०४/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाचा दिनांक जर असेत तर | | ---- |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप निश्चित केला | दोषी निर्दोष | शिक्षा ठोठावली | फौ. प्र. स.च्या अनुषंगाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कृष्णकांत पंढरीनाथ संपतवार | १९/०७/२५ रोजी कलम ३५ (३) बी.एन. एस.एस. प्रमाणे नोटीस देवून सोडण्यात आले. | --- | कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा | निर्दोष | नाही | --- |

## भाग – क

## (**Para** 44 (**iii**) **of Chapter VI of Criminal Manual**)

## फिर्यादी /बचाव पक्ष /न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. फिर्यादी साक्षीदारांची यादी –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | किशन विठ्ठल सोनमनकर | जप्ती पंच |

### ब. बचावपक्ष साक्षीदारांची यादी –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**फिर्यादी /बचाव पक्ष /न्यायालयीन निशाणी क्रमांक यादी**

**अ. फिर्यादी निशाणी क्रमांक यादी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | -- | -- |

**ब. बचावपक्ष निशाणी क्रमांक यादी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक यादी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल वस्तु निशाणी क्रमांक यादी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ०४/०५/२०२६)

आरोपी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणेच्या दोषारोपा–खालील संपरिक्षेस सामोरे जात आहे.

२. सदर प्रकरणातील पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन करता खालील मुद्दे अवलोकनार्थ निघतात, त्यांचे उत्तर मी त्यांच्यापुढे नोंदविल्याप्रमाणे दिले आहे.

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | आरोपीने दिनांक १९/०७/२०२५ रोजी गडगा ता. नायगांव, जि. नांदेड हा त्याच्या ताब्यातील बिना परवाना बेकायदेशीर रित्या देशी दारू १८० एम. एल. चे सिलबंद एकूण १३ बॉटल ज्याची कि. अं. रूपये ९१०/– रूपयाचा माल आपल्या ताब्यात विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगले हे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही.** |
| ०२. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करिता

३. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षातर्फे आरोपीचा आरोप सिद्ध करण्याकरिता स.सा.क्र. १ किशन विठ्ठल सोनमनकर यांचा पुरावा नोंदविण्यात आला. वारंवार संधी देवूनही अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नि. १ वर आदेश करुन सरकारपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

४. स.सा.क्र. १ किशन विठ्ठल सोनमनकर या साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत केली नसल्याने त्यांना फितूर घोषीत करण्यात आले व उलटतपास घेण्यात आला,

परंतू सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत होईल असा कोणताही पूरावा दिलेला नाही. त्यांनी जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली नसून त्यातील मजकुराविषयी अभिज्ञता दर्शविली आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासात दि. १९/०७/२०२५ रोजी पोलीसांनी आरोपीच्या घरासमोरील मोकळया जागेतून १८० मि.ली. च्या १३ देशी दारु भिंगरी संत्रा कंपनीच्या सिलबंद बाटल्या मिळून आल्या, त्यांना पोलीसांनी घटनास्थळ पंचनाम्याला बोलाविले व त्यांचे समक्ष पंचनामा केला ही बाब नाकारली आहे. सदरील साक्षीदाराने सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयोगी ठरलेली नाही.

५. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी अथवा तपासीक अधिकारी यांची साक्ष अभियोगपक्षाच्या वतीने नोंदविण्यात आलेली नाही. सदर प्रकरणात रासायनिक परिक्षण अहवाल देखील अभिलेखावर दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा देशी दारु भिंगरी संत्राच होती याबाबत शंका उपस्थित होते. तसेच घटनेच्यावेळी घटनास्थळावर आरोपीच त्याच्या ताब्यात विनापरवाना देशी दारु भिंगरी संत्रा बेकायदेशीररित्या विक्री करिता बाळगले, याबाबत ठोस पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे व अभियोग पक्षाने पूराव्याअभावी सिद्ध केले नसल्यामुळे मी मुद्दा क्र. १ वर नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

६. प्रस्तुत प्रकरणात इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाच्या वतीने नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपीने त्याचे स्वतःचे ताब्यात विनापरवाना देशी दारु बेकायदेशीरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगली. तसेच जप्त केलेल्या दारुच्या बॉटल आरोपीच्याच ताब्यातून जप्त केल्या होत्या, हे अभियोगपक्षाने पूराव्याअभावी सिद्ध केले नसल्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता</u>**

७. मुद्दा क्र. १ वरील नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता अभियोगपक्ष आरोपीवरील दोषांकीत गुन्हा सिद्ध करण्यास असमर्थ ठरल्याने निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. उर्वरित मुद्देमाल नाश करण्यासाठी संबंधित अधिक्षक दारुबंदी व उत्पादन शुल्क देगलूर यांचेकडे अपील कालावधी नंतर पाठवणे योग्य होईल. करिता मुद्दा क्र. २ चे

उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करीत आहे.

**– आ दे श –**

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी **कृष्णकांत पंढरीनाथ संपतवार** यास महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणेच्या दोषारापातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१)) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | आरोपीचे बंधपत्र व जामीन रद्द करण्यात येते. |
| **३.** | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ (१) (फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्र द्यावे, जे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल. |
| **४.** | उर्वरित जप्त मुद्देमाल नाश करण्यासाठी संबंधित अधिक्षक दारुबंदी व उत्पादन शुल्क देगलूर, यांचेकडे अपील कालावधी नंतर पाठविण्यात यावा. |
| | ***न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.*** |

Sd/–

**(श्रीमती ए. टी. गित्ते)**

दि.– ०४/०५/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग नायगाव बा.